# फळसेवाडी हितकारी संस्था
## वार्षिक सर्वसाधारण सभा

**दिनांक** : शुक्रवार 18 एप्रिल 2014
**स्थळ** : 14 कर्मचारी निवास, शहाजीराजे भोसले क्रिडा संकुल, अंधेरी – पूर्व, मुंबई – 400 053

**उपस्थिती**

| | |
|---|---|
| 1. श्री सुनिल सदानंद राणे | 9. श्री रंजन रावजी म्हसकर |
| 2. श्री मंगेश मनोहर राणे | 10. श्री अविनाश बाळकृष्ण राणे |
| 3. श्री पांडूरंग सावजी राणे | 11. श्री संतोष मधुसुदन राणे |
| 4. श्री जयवंत नाना राणे | 12. श्री सुनिल विनायक राणे |
| 5. श्री शंकर बाळकृष्ण राणे | 13. श्री हेंमतकुमार रमेश राणे |
| 6. श्री लवू शिवाजी राणे | 14. श्री आनंद नारायण साटम |
| 7. श्री दशरथ दत्ताराम साटम | 15. श्री विश्वनाथ दिनकर राणे |
| 8. श्री उदय भगवान राणे | |

फळसेवाडी हितकारी संस्था, मुंबई यांची वार्षिक सर्वसाधारण सभा शुक्रवार दिनांक 18 एप्रिल 2014 रोजी श्री मंगेश मनोहर राणे यांच्या घरी संपन्न झाली. सभेस 15 सभासद उपस्थित होते.

या सभेस जेष्ठ नागरिक व उपाध्यक्ष श्री पांडूरंग सावजी राणे यांची सभेचे अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. अध्यक्षांनी सर्वांचे स्वागत केले.

सभेच्या प्रथेप्रमाणे वाडीतील दिवंगत कै दशरथ शिवाजी राणे, कै प्रभावती शिवराम राणे यांना 2 मिनीटे स्तब्ध राहून श्रध्दांजली वाहण्यात आली. तसेच लष्करी जवान  व इतर दुर्घटनांमध्ये शहीद पोलिस जवान व इतर मान्यवरांनाही श्रद्धांजली देण्यात आली.

दिनांक 07 डिसेंबर 2013 व दिनांक 12 जानेवारी 2013 याठिकाणी झालेल्या सभेच्या इतिवृत्ताचे वाचन करून मंजूर केले.

चिटणीसांचा कार्य अहवालाचे वर चर्चा करून मंजूर करणे यामध्ये वाडीतील गाडीतळ ते टेंबवाडी जोडणार रस्ता यावर विशेष चर्चा झाली. या चर्चेत श्री लवू शिवाजी राणे यांनी विशेष प्रश्न उपस्थित केला की गावासाठी माननीय नारायणराव राणे साहेव तसेच माननीय खासदार श्री निलेश राणेसाहेब मदत का देत नाहीत ? ते देत नसतील तर स्थानिक आमदार श्री प्रमोद जठार यांची मदत घ्यावी. यावर अध्यक्षांनी खुलासेवार उत्तर दिले की आपण प्रथम कच्चा रस्ता बनवायचा असतो त्यानंतर सरकार खडीकरण / डांबरीकरण (नियम 26) करते. तरी आपण सध्या यासाठी निधी उभारून खर्च केला आहे. यावर पाठपुरावा करुया व या रस्त्यास सर्वांनी मंजूरी दिली.

पुर्नलिखित इतिवृत्त
मुळ दस्तऐवज : MR-02-(60 to 62)

श्विहीर दुरुस्तीबद्दल चर्चा झाली, यापुढे ज्या व्यक्तीला वाडीसाठी काम करावयाचे आहे त्या दानशुराकडून फंड संस्थेच्या फंडामध्ये घ्यावा व नंतर खर्च करावा असे ठरले.

श्री अभयनाथ भगवान साटम यांनी पाठविलेल्या धमकीवजा पत्रावर चर्चा झाली व श्री अभयनाथ भगवान साटम यांच्या पत्राचे उत्तर देण्याचे ठरले. तसेच सरपंच व इतर संबधीतांना पत्र देण्याचे ठरले.

नविन विहीरीवर चर्चा झाली. संस्थेचे अध्यक्ष श्री मंगेश मनोहर राणे यांच्यावर ही जबाबदारी देण्यात आली. रस्त्याच्या झालेल्या खर्चास तत्वत: मंजूरी दिली.

गणसंख्येअभावी निवडणूक घेण्यात आली नाही व सध्या अस्तित्वात असलेल्या कमिटीस पुढे वाढ देण्यात आली.

पुढील कामाच्या वाटचालीमध्ये ब्राह्मण विहीर दुरुस्ती, ब्राह्मण भोजन, देवाचा आंबा ते तांबळ येथील डांबरीकरण आदींवर चर्चा झाली.

रस्त्यास देणगी देणारे श्री विरेंन्द्र अनंत राणे व श्री दशरथ दत्ताराम साटम यांचा सत्कार करण्यात आला. तसेच श्री मंगेश मनोहर राणे यांना पदोन्नती मिळाल्याबद्दल सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी चहापाण्याच्या खर्च श्री मंगेश मनोहर राणे  उभयतांनी केला त्याबद्दल त्यांचे आभार मानन्यात आले. संस्थेच्या भरभराटीबद्दल चर्चा होऊन सभेचा कार्यक्रम संपल्याचे जाहीर करण्यात आले.

---

पुर्नलिखित इतिवृत्त
मुळ दस्तऐवज : MR-02-(60 to 62)